
फक्त कार्यालयीन उपयोगा करिता

# मराठवाडा विकास मंडळ

## वार्षिक अहवाल २०११-१२



MARATHWADA DEVELOPMENT BOARD
ANNUAL REPORT 2011-12

MARATHWADA DEVELOPMENT BOARD, AURANGABAD.

# मराठवाडा विकास मंडळाचा

# सन २०११-२०१२ चा

# वार्षिक अहवाल

## ANNUAL REPORT OF THE

## MARATHWADA DEVELOPMENT BOARD AURANGABAD

## FOR THE YEAR 2011-2012

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) (अ) आणि विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, १९९४ च्या अनुच्छेद ६ (ड) अन्वये विधीमंडळासमोर मांडण्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या मा.राज्यपालांकडे सादर.

**Submitted to the Hon'ble Governor of Maharashtra for placing before the Legislature under Article 371 (2) (a) of the Constitution of India and Clause 6 (d) of the Development Boards for Vidarbha, Marathwada and the Rest of Maharashtra Order, 1994.**


मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,
तळमजला, पश्चिमबाजू,
औरंगाबाद - ४३१ ००१.
दुरध्वनी : २३३५०४६/२३३९०८३
फॅक्स : ०२४०-२३३९०८३
ईमेल : msdb.aurangabad@gmail.com

Central Administrative Building,
Ground Floor, West Wing,
Aurangabad - 431 001.
Phone : 2335046/2339083
Fax : 0240-2339083
Email No. msdb.aurangabad@gmail.com

# मराठवाडा विकास मंडळ, औरंगाबाद

जा.क्र.मविमं/वार्षिक-अह/२०११-१२/
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,
जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,
औरंगाबाद - ४३१ ००१.
दिनांक : / /२०१२

प्रति,

**मा.राज्यपाल**,
महाराष्ट्र राज्य,
राजभवन, मलबार हिल्स,
मुंबई - ४०० ०३५.

**विषय : मराठवाडा विकास मंडळाचा वर्ष २०११ - २०१२ चा वार्षिक अहवाल.**

आदरणीय महोदय,

मराठवाडा विकास मंडळाचा वर्ष २०११-२०१२ चा वार्षिक अहवाल सादर करतांना मला अतिशय आनंद होत आहे.

मराठवाडा विभागात औद्योगिक आणि सामाजिक मुलभूत सुविधेतील गुंतवणूकीत वाढ होणे गरजेचे आहे. यामुळे मराठवाडा विभागातील दरडोई उत्पन्नात वाढ होऊ शकेल. मुलभूत सुविधे अभावी औरंगाबाद वगळून इतर जिल्ह्यात नवीन उद्योजक येण्यास धजावत नाहीत तसेच विभागातील उपलब्ध सिंचन सुविधेचा सुयोग्य वापर होण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानांच्या वापरास प्रोत्साहन देणे आणि सुक्ष्म सिंचन साधनांवरील अनुदानात वाढ करणे गरजेचे आहे. राज्यात २५० हे. सिंचन क्षमतेपेक्षा अधिक सिंचन क्षमतेचे नविन तलावाचे काम हाती घेण्यास बंधने आहेत. मात्र मराठवाड्यातील भौगोलिक परिस्थिती विचारात घेता ६०० हे. पर्यंत सिंचन क्षमतेचे साठवण तलाव घेण्यास वाव आहे. या करिता मराठवाडा विभागात असे नविन साठवण तलाव घेण्यास विशेष बाब म्हणून मुभा देणे आवश्यक आहे.

शिक्षण क्षेत्राचा विचार करता मराठवाडयातील सर्वच जिल्हयाचे साक्षरतेचे प्रमाण हे राज्याच्या सरासरीपेक्षा कमी असल्यामुळे शिक्षण क्षेत्रात तसेच आदिवासी भागातील मुलांचे कुपोषण कमी करण्यासाठी विशेष कार्यक्रमांची आवश्यकता आहे.

मा.महोदयांकडून मंडळाला सतत मार्गदर्शन लाभले आहे याचा मी कृताज्ञतापूर्वक उल्लेख करु इच्छितो. मा.महोदयांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मंडळ त्यांचे अत्यंत आभारी असून यापुढेही त्यांचेकडून असेच सहकार्य लाभेल, अशी हे मंडळ आशा व्यक्त करते.

आपला नम्र,

17/10/12

**(संजीव जयस्वाल)**
प्रभारी अध्यक्ष व
विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग

# ऋण निर्देश

मराठवाडा विकास मंडळाला मा.राज्यपाल महोदयांकडून वेळोवेळी मार्गदर्शन लाभले आहे. त्याबद्दल मंडळ त्यांचे अत्यंत ऋणी आहे.

मा.राज्यपाल महोदयांनी मराठवाडा विभागाचे विकासासाठी आस्थेने लक्ष दिले. विकास कामांचे संदर्भात त्यांनी वेळोवेळी संवाद साधला. त्यामुळे मंडळाला सहजतेने आपली कर्तव्ये पार पाडणे शक्य झाले आहे.

महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री आणि मंत्रीमंडळातील त्यांचे सहकारी मंत्री यांनी सुध्दा मराठवाड्याचे विकासासाठी आस्थेने लक्ष दिले. मराठवाडा विभागाच्या विकासाकरिता कालबध्द कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकडे विशेष लक्ष दिले. त्याबद्दल मंडळ मा.मुख्यमंत्री महोदयांचे ऋणी आहे. मराठवाडा विभागातील विकासांच्या प्रस्तावांना मान्यता मिळवून देण्यासाठी राज्यमंत्री मंडळातील अनेक मंत्र्यांचे सहकार्य प्राप्त झाले आहे. त्याबद्दल मंडळ त्यांचेही ऋणी आहे.

मंडळाच्या कार्यात मराठवाड्यातील लोकप्रतिनिधी, मा.खासदार, मा.आमदार, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व पदाधिकारी, नगरपालिकांचे अध्यक्ष व सदस्यगण, मराठवाड्यातील आदरणीय स्वातंत्र्यसैनिक, समाजसेवक यांनी मंडळास सहकार्य केले. त्याबद्दल मंडळ त्यांचा सुध्दा कृतज्ञतापुर्वक उल्लेख करते.

मंडळाचा विकास कामांशी संबंध असल्यामुळे मंडळाला काही तज्ञ व्यक्तिंकडून बहुमोल सहकार्य लाभले त्या सर्वांचे विशेष आभार मानून त्याबद्यल मंडळ कृतज्ञ आहे.

अहवाल वर्ष काळामध्ये मंडळाला मंत्रालयीन विभागाशी कामाचे निमित्ताने नेहमीच संपर्क साधावा लागला. या सर्व विभागांनी मंडळाला वेळोवेळी सहकार्य केले आहे. त्याबद्दल राज्याचे मुख्य सचिव, अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व इतर सर्व विभागीय सचिव आणि त्यांचे सहकारी यांचे मंडळ कृतज्ञतापुर्वक उल्लेख करते व त्यांचे आभार मानते.

राज्यपाल कार्यालयाशी व शासनाच्या नियोजन विभागाशी कामकाजाचे निमित्ताने मंडळाचा सततचा संपर्क राहिला आहे. नियोजन विभागाचे प्रधान सचिव, मा राज्यपाल कार्यालयाचे सचिव, सहसचिव (विकास मंडळे), नियोजन विभागाचे उपसचिव आणि त्यांचे सहकारी यांनी मंडळाला दैनंदिन कामकाजात अत्यंत मोलाचे सहकार्य दिले व त्यामुळे मंडळाला आपले काम करणे सुकर होऊ शकले, याबद्दल मंडळ या सर्वांचे आभारी आहे.

# मराठवाडा विकास मंडळ, औरंगाबाद
## वार्षिक अहवाल वर्ष २०११-२०१२

अनुक्रमणिका


| अ क्र | विषय | पान क्रमांक |
|---|---|---|
| **प्रकरण-१** | **विकास मंडळाची स्थापना व कामाचे स्वरुप** | |
| १.१ | महाराष्ट्र राज्य आदेश, १९९४ | १ |
| १.२ | विकास मंडळाची स्थापना | १ |
| १.३ | विकास मंडळाची रचना | १ |
| १.४ | मंडळ व सदस्यांचा कार्यकाळ | २ |
| अ) | मंडळाचा कार्यकाळ | २ |
| ब) | मंडळावरील सदस्यांचा कार्यकाळ | ३ |
| १.५ | विकास मंडळाची कार्ये | ४ |
| १.६ | विकास कामांच्या खर्चासाठी निधीचे वाटप | ४ |
| १.७ | वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये निधीच्या वाटपाचे निर्देश करणे | ५ |
| १.८ | राज्यपालांकडून निदेश | ५ |
| १.९ | शिक्षण, प्रशिक्षण आणि सेवा योजन यासाठी सुयोग्य व्यवस्था | ७ |
| **प्रकरण-२** | **मंडळाच्या सदस्य सचिवांचा अहवाल** | |
| २.१ | मंडळाचे कार्यक्षेत्र व मुख्यालय | ८ |
| २.२ | कार्यालय आस्थापना | ८ |
| २.३ | मंडळाच्या सर्वसाधारण बैठका | १० |
| २.४ | विषय समित्यांच्या बैठका | १० |
| २.५ | इतर बैठका | ११ |
| २.६ | नियोजन मंडळाच्या बैठकीमध्ये विकास मंडळाचा सहभाग | ११ |
| २.७ | विविध कार्यशाळेस मंडळाचे तज्ज्ञ सदस्यांचा सहभाग | ११ |

# अनुक्रमणिका


| अ क्र | विषय | पान क्रमांक |
|---|---|---|
| **प्रकरण-३** | **कामकाजासंबंधी अनुषंगीक बाबींवर मंडळाच्या शिफारशी** | |
| ३.१ | मराठवाडा विभागातील आदिवासी भागाचा पाहणी अभ्यास | १३ |
| ३.२ | आंतर विभागीय विकासाचे महत्वाचे निर्देशांक | १४ |
| अ) | विभागीय दरडोई विकास दर तुलना | १४ |
| ब) | तुलनात्मक औद्योगिक प्रगती: | १६ |
| क) | विशेष आर्थिक क्षेत्र व मागास विभाग:- | १७ |
| **प्रकरण-४** | **समतोल प्रादेशिक विकासाच्या समस्यांचा आढावा** | |
| ४.१ | समतोल प्रादेशिक विकासाच्या समस्यांचा आढावा घेण्यासाठी उच्चस्तरीय समितीची स्थापना | १८ |
| ४.२ | उच्चस्तरीय समितीची कार्यकक्षा | १९ |
| ४.३ | समतोल प्रादेशिक विकास समितीचा औरंगाबाद विभागाचा दौरा | १९ |
| ४.४ | उच्चस्तरीय समितीसमोर मराठवाडा विकास मंडळाचे सादरीकरण | २० |
| ४.५ | राज्य शासनाची थेट गुंतवणूक/ खर्च आणि राज्य व केंद्र शासनाच्या मदतीने खाजगी औद्योगीक क्षेत्रात झालेली गुंतवणूक यांचा विचार | २१ |
| ४.६ | निश्चित होणारा असमतोल दूर करण्यासाठी उपाय योजना | २१ |
| ४.७ | मराठवाडा विकास मंडळाची प्रस्तावित कार्यकक्षा | २२ |
| **प्रकरण-५** | मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांनी सन २०१२-१३ च्या वार्षिक योजनेतुन सिंचन क्षेत्रासाठी प्रस्तावीत केलेले नियत व्यय | |
| ५.१ | सिंचन क्षमतेत सुधारणा | २३ |
| ५.२ | सिंचन क्षेत्रासाठी निधी वाटपाचे सुधारीत सुत्र | २३ |
| ५.३ | सिंचन क्षेत्रासाठी २०१२-१३ तील नियतव्ययाचे वाटप | २४ |

# प्रकरण – एक

## मराठवाडा विकास मंडळाची स्थापना व कामाचे स्वरुप

### १.१ महाराष्ट्र राज्य आदेश, १९९४ :

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) अंतर्गत प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, भारताच्या राष्ट्रपतींनी "**महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी) आदेश, १९९४**" निर्गमित केले आहे. या आधारे मा.राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ५ सप्टेबर २०११ रोजी सुधारित राजपत्र निर्गमित केले. या राजपत्रानुसार यथोचीत बदल करुन विकास मंडळाचे कार्य सुरु आहे.

### १.२ विकास मंडळाची स्थापना :

भारताच्या राष्ट्रपतींनी निर्गमित केलेल्या महाराष्ट्र राज्य आदेश, १९९४ मधील तरतुदी अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्यांचे आदेश क्रमांकः जीएस /जी /९४/ डी बी / ४३२, दि. ३० एप्रिल, १९९४ अन्वये राज्यामध्ये विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या विभागांसाठी तीन स्वतंत्र विकास मंडळांची स्थापना केली. तसेच राज्यातील प्रत्येक विकास मंडळाचे कार्यक्षेत्र ठरवून दिले. महाराष्ट्राचे राज्यपाल, याबाबतीत काढण्यात आलेल्या आदेशाव्दारे महाराष्ट्र राज्यातील विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र कार्यक्षेत्रासाठी प्रत्येकी एक विकास मंडळ गठित करतील. ही मंडळे अनुक्रमे पुढील प्रमाणे ओळखली जातील.-

अ) विदर्भ विकास मंडळ, ब) मराठवाडा विकास मंडळ, क) उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ

दिनांक ५ सप्टेबर २०११ च्या राजपत्रानुसार विकास मंडळाची रचना व कार्य यांत कांही अंशी बदल करण्यात आलेले आहे.

### १.३ विकास मंडळांची रचना :

१) प्रत्येक विकास मंडळ हे, अध्यक्षासहित पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल आणि त्यांची नियुक्ती राज्यपालांकडून करण्यात येईल-

**अ)** राज्य नियोजन मंडळाचा कार्यकारी अध्यक्ष, या सर्व तीनही विकास मंडळांचा पदसिध्द सदस्य असेल

**ब)** मराठवाडा विकास मंडळाच्या बाबतीत, औरंगाबाद महसुली विभागातून महाराष्ट्र राज्य विधान मंडळाचा एक सदस्य असेल, आणि इतर विकास मंडळांच्या बाबतीत,. संबंधीत विकास मंडळाच्या

कार्यक्षेत्रामधील प्रत्येक महसुली विभागांतून महाराष्ट्र विधान मंडळाचा एक सदस्य, आळीपाळीने, अडीच वर्षाच्या मुदतीसाठी असेल. अशा सदस्यांने त्याची मुदत पूर्ण केल्यावर, तो, लागोपाठच्या मुदतींसाठी पात्र असणार नाही.

**क)** संबंधीत विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रातील, स्थानिक नागरी प्राधिकरणातून व स्थानिक ग्रामीण प्राधिकरणातून प्रत्येकी एक सदस्य, आळीपाळीने, अडीच वर्षांच्या मुदतीसाठी असेल. अशा सदस्यांने त्याची मुदत पूर्ण केल्यावर, तो, लागोपाठच्या मुदतीसाठी पात्र असणार नाही.

**ड)** सामाजिक - आर्थिक विकासामध्ये कार्यरत असलेल्या अशासकीय संघटना आणि राष्ट्रीय/ राज्य स्तरावरील नामवंत संस्था यांच्या प्रतिनिधीसह पाच तज्ञ व्यक्ती. किमान एक तज्ञ व्यक्ती ही, प्रत्येक महसुली विभागातील असेल. या तज्ञ व्यक्तींकडे, प्रशासन विकास, नियोजन प्रक्रिया, शासनाची वित्त व्यवस्था व लेखे किंवा विविध सामाजिक - आर्थिक क्षेत्रांमधील विशेष ज्ञान असेल,

**इ)** संबंधीत विकास मंडळांच्या कार्यक्षेत्रातील महसूल विभागांचे आयुक्त,

**फ)** महसुली विभागाच्या अपर आयुक्तांच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेला राज्य शासनाचा अधिकारी हा, प्रत्येक संबंधीत विकास मंडळाचा सदस्य - सचिव असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे पत्र क्रमांक: आरबी / डीबी / रुल्स-१४ / ऑर्डर / २०११ / १६१ दिनांक १२ सप्टेबर २०११ अन्वये पान क्रमांक - ७ वरील आदेशानुसार मा. श्री. भास्कर मुंढे, विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना दिनांक ५ सप्टेबर २०११ पासून मराठवाडा विकास मंडळाचे अध्यक्ष पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविला आहे. तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र क्रमांक जीएस / डीएस / डीसी / मेंबर / अपॉईंटमेंट / २०१२ /६१ दिनांक २८.०२.२०१२ अन्वये खालील चार तज्ञ सदस्यांची मराठवाडा विकास मंडळासाठी नियुक्ती केलेली आहे. **(महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग आठ, असाधारण क्रमांक-५, प्राधिकृत प्रकाशन, आदेश दिनांक २४.०२.२०१२)**

१. डॉ आर पी कुरुलकर, २.डॉ डी एस लोहिया, ३. श्री विजय दिवान, ४. श्री मुकुंद ए कुलकर्णी

## १.४ मंडळ व सदस्यांचा कार्यकाळ

### अ) मंडळाचा कार्यकाळ:

वैधानिक विकास मंडळे स्थापन केल्यानंतर दिनांक ३० एप्रिल, १९९९ रोजी वैधानिक विकास मंडळांचा पांच वर्षाचा कार्यकाल पूर्ण झाला. विकास मंडळांची मुदत संपल्यानंतर, त्यांचा कार्यकाळ वाढविण्याकरिता भारताच्या राष्ट्रपतींनी दिनांक २९ एप्रिल, १९९९ च्या आदेशान्वये पुन्हा "**महाराष्ट्र**

**राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी) सुधारित आदेश १९९९"** निर्गमित केले. त्यानुसार राज्यातील तीनही वैधानिक विकास मंडळांचा कार्यकाल **३० एप्रिल**, २००४ पर्यंत पुढील पांच वर्षांच्या काळासाठी वाढविण्यात आला. तसेच, मा.राज्यपाल **महोदयांनी** दिनांक १ मे, २००४ चे आदेशाद्वारे वैधानिक विकास मंडळांचा कार्यकाल दिनांक ३० **एप्रिल,** २००५ पर्यंत वाढवून देण्यात आला होता. १० जानेवारी, २००६ चे पत्रान्वये राज्यातील **तीनही** विकास मंडळांना ३० एप्रिल, २०१० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यानंतर **मा.** राज्यपाल महोदयांनी सदर विकास मंडळे क्षेत्रिय विकासासाठी महत्वाची भुमिका बजावत **असल्याने** त्यांना पुन्हा मुदतवाढ देणे बाबत मा. राष्ट्रपती महोदयांकडे शासनाच्यावतीने शिफारस **करण्यात** आली. त्यानुसार भारत सरकारचे **दि. २६ जुलै २०१० च्या राजपत्रानुसार राज्यातील तीनही विकास मंडळास दि.३० एप्रिल २०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.**

**ब) मंडळावरील सदस्यांचा कार्यकाळ (२०११-२०१२ ) :**

**वर्ष** २०११-१२ या कालावधीमध्ये मराठवाडा विकास मंडळाचे अध्यक्ष व सदस्य खालीलप्रमाणे होते.

| अ क्र | नांव | पद | कार्यकाल | |
|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत |
| १ | मा.डॉ. आर.पी.कुरुलकर | प्रभारी अध्यक्ष | ०१.०४.२०११ | ०५.०९.२०११ |
| २ | मा. श्री भास्कर मुंढे, भा.प्र.से. | प्रभारी अध्यक्ष | ०५.०९.२०११ | |
| ३ | मा. श्री बाबासाहेब कुपेकर, कार्यकारी अध्यक्ष,राज्य नियोजन मंडळ | पद सिध्द सदस्य | ०१.०४.२०११ | |
| ४ | मा. आ. श्री भाऊराव बाबुराव पाटील | सदस्य | ०१.०४.२०११ | ०५.०९.२०११ |
| ५ | मा आ. श्री चंद्रकांत दानवे | सदस्य | ०१.०४.२०११ | ०५.०९.२०११ |
| ६ | मा.श्री राजकिशोर मोदी, अध्यक्ष, नगरपरिषद,अंबाजोगाई, बीड | सदस्य | ०१.०४.२०११ | ०५.०९.२०११ |
| ७ | मा. डॉ. एस. बी. नाकाडे | सदस्य | ०१.०४.२०११ | ०५.०९.२०११ |
| ८ | मा. डॉ. जी. जी. नांदापूरकर | सदस्य | ०१.०४.२०११ | ०५.०९.२०११ |
| ९ | मा. श्री एस. एल. वरुडकर | सदस्य | ०१.०४.२०११ | ०५.०९.२०११ |
| १० | मा. डॉ. आर. पी. कुरुलकर | सदस्य | २४.२.२०१२ | |
| ११ | मा. डॉ. डी. एस. लोहिया | सदस्य | २४.२.२०१२ | |
| १२ | मा. श्री विजय दिवान | सदस्य | २४.२.२०१२ | |
| १३ | मा. श्री मुकुंद ए. कुलकर्णी | सदस्य | २४.२.२०१२ | |
| १४ | मा.श्री भास्कर मुंढे, **(भा.प्र.से.)** विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग | पद सिध्द सदस्य | ०१.०४.२०११ | |
| १५ | मा. श्री पंकज कुमार, **(भा.प्र.से.)** अपर आयुक्त व सदस्य सचिव | सदस्य सचिव | ०१.०४.२०११ | |

**१.५ विकास मंडळाची कार्ये :** विकास मंडळे, वेळोवेळी-

**अ)** मंडळाच्या कार्यक्षेत्राची साधन संपत्ती, गरजा व संधी यांचा विचार करुन आणि संपूर्ण राज्याचा विकास लक्षात घेऊन, त्यांच्या कार्यक्षेत्राच्या संबंधात, सामाजिक-आर्थिक विकासाच्या क्षमतेची निश्चिती करतील,

**ब)** मंडळाच्या कार्यक्षेत्रामध्ये ज्यांच्यावर विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असेल अशी कार्यक्षेत्रे, भाग, लोकसंख्या गट निश्चित करतील,

**क)** प्रादेशिक / जिल्हा विकास अहवाल तयार करतील आणि ते नियतकालाने अद्ययावत करतील. प्रादेशिक/ जिल्हा विकास अहवालामध्ये पुढील बाबींचा समावेश असेल,-

(एक) स्थानिक मानवी व नैसर्गिक साधन संपत्तीचे निर्धारण व सामाजिक- आर्थिक विकासा बाबतची क्षमता यांचे पृथ:करण,

(दोन) संबंधित सामाजिक -आर्थिक क्षेत्रांच्या विकास निर्देशांकानुसार महत्वाच्या लोकसंख्या गटांची विकास स्थिती

(तीन) आरोग्य, शिक्षण व उपजीविकेचे प्रश्न यांसारख्या मानवी विकास निर्देशांकाच्या विकास स्थितीची संगणना,

(चार) प्रदेशांची साधन संपत्ती व त्यांची क्षमता यांच्या आधारे प्रादेशिक विकास योजनेचा आराखडा,

(पांच) योजनांतर्गत कार्यक्रमाच्या आणि संपूर्ण प्रादेशिक विकासाच्या निर्धारणावरील व मूल्यमापनावरील परिणाम,

**ड)** वार्षिक, तसेच पंचवार्षिक योजनेच्या काळात गरजाधारित संतुलित प्रादेशिक विकास विचारात घेऊन विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रावरील विकास खर्चाच्या पातळया सुचवतील,

**इ)** मंडळाच्या कार्यक्षेत्राच्या सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टीने तसेच त्या भागातील विकासाचा प्रादेशिक असमतोल दूर करण्याच्या दृष्टीने करण्यात आलेल्या विविध विकासाच्या प्रयत्नांच्या परिणामांचे मूल्यमापन करतील,

**फ)** मंडळाच्या कार्याचा वार्षिक अहवाल तयार करतील व तो, महाराष्ट्र राज्य विधान मंडळापुढे सादर करण्यासाठी प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यावर व्यवहार्य असेल तेथवर, तीन महिन्याच्या कालावधीत राज्यपालांना सादर करतील,

## १.६ विकास कामाच्या खर्चासाठी निधीचे वाटप :

**अ)** राज्याची एकूण गरज साकल्याने विचारात घेऊन विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रावरील विकास खर्चासाठी, महाराष्ट्राचे राज्यपाल, निधीचे समन्यायाने वाटप व्हावे याची खातरजमा करतील

**ब)** निधीचे समन्यायाने वाटप होईल याची खातरजमा करतांना, राज्यपाल

**(एक)** विकास मंडळाने कोणत्याही शिफारशी केल्या असल्यास त्या विचारात घेतील, आणि

**(दोन)** निधीच्या वाटपाच्या बाबतीत, राज्यपाल त्यांना आवश्यक आणि योग्य वाटेल अशा कोणत्याही व्यक्तींचा किंवा व्यक्तीसंघाचा सल्ला घेऊ शकतील.

**१.७ वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये, निधीच्या वाटपाचे निर्देश करणे :-**

निधी किंवा नियतव्यय यांच्या, राज्यपालांनी ठरवून दिलेल्या वाटपाचा निर्देश, राज्य विधी मंडळापुढे सादर करावयाच्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये (पुरवणी अर्थ संकल्पासह) करण्यात येईल आणि उपरोक्त नियतव्ययाशी संबंधीत विकास कार्ये राज्य शासनाकडून पूर्ण करण्यात येतील वा पूर्ण करुन घेण्यात येतील आणि अशा प्रकारे देण्यात आलेला निधी हा , एका मंडळाच्या कार्यक्षेत्रामधून दुस-या मंडळाच्या कार्यक्षेत्राकडे वळविता येणार नाही. राज्य शासन, सर्व क्षेत्रां करिताच्या विकास खर्चासाठी प्रदेशनिहाय व प्रवर्गनिहाय नियतव्यय व खर्च यांचे विवरणपत्र देखील तयार करतील. या विवरणपत्रामध्ये मागील वित्तीय वर्षासाठीच्या प्रत्यक्ष संवितरीत रकमा व सुधारित खर्च यांचा तसेच, मागील वित्तीय वर्षाच्या अगोदरच्या वर्षासाठीच्या प्रत्यक्ष संवितरीत रकमा व प्रत्यक्ष खर्च यांचा तपशील दिलेला असेल.

**परंतू -**

**अ)** एखाद्या मंडळाच्या कार्यक्षेत्रामध्ये पूर्वोक्तानुसार हाती घेण्यात आलेल्या विकास कार्याच्या बाबतीत, अर्थ संकल्पीय नियम व कार्य पध्दतीला अनुरुप असे पूनर्विनियोजन करता येईल.

**ब)** विकास कार्याची अंमलबजावणी करतांना सध्याचे मापदंडच चालू राहतील, आणि

**क)** विकास कार्यावर संबंधीत प्रशासकीय विभागाचे प्रशासकीय व तांत्रिक पर्यवेक्षण आणि नियंत्रण सध्या प्रमाण। चालू राहतील.

**१.८ राज्यपालांकडून निदेश :**

**मा.** राज्यपाल महोदयांचे आदेश वित्तीय वर्ष, २०११-१२ च्या वार्षिक योजनेतील नियत व्ययाच्या प्रदेशनिहाय संवितरणाकरिता, विदर्भ मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, १९९४ मधील नियम ७ अन्वये महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी दिलेले निदेश.

(१) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) अन्वेय भारताच्या राष्ट्रपतींनी केलेल्या महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी) आदेश, १९९४ याव्दारे विदर्भ मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळाच्या क्षेत्रांच्या संबंधात संविधानाच्या अनुच्छेद ३७१ चा खंड (२)उपखंड (ख) आणि (ग) मध्ये विनिर्दिष्ठ केलेल्या

बाबींसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांवर विशेष जबाबदारी सोपविली आहे. दिनांक ३० एप्रिल, १९९४ रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश १९९४ काढला (यात यापुढे ज्याचा उल्लेख आदेश असा करण्यात आला आहे) व त्याव्दारे उक्त तीन प्रदेशासाठी स्वतंत्र विकास मंडळे गठित केली.

(२) उक्त आदेशाच्या नियम ७ अनुसार, एकूण राज्याच्या म्हणून असलेल्या गरजांचा विचार करुन विकास मंडळाच्या क्षेत्रांवरील विकास खर्चासाठी निधीचे समन्याय्यतेने नियत वाटप होत असल्याची खात्री करुन घेणे, ही महाराष्ट्राचे राज्यपाल यांची विशेष जबाबदारी आहे.

(३) उक्त आदेशाच्या नियम ८ अनुसार, राज्यपाल यांनी केलेले निधीचे किंवा नियत व्ययांची नियत वाटप, राज्य विधान मंडळापुढे ठेवावयाच्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रात दर्शविण्यात येईल आणि उपरोक्तपणे नियत व्ययांच्या संबंधातील विकास कार्ये, राज्य शासन पार पाडील किंवा पार पाडावयास लावील आणि असे नियत वाटप केलेले निधी हे, एका मंडळाकडून दुस-या मंडळाकडे न वळवता येण्याजोगे असतील.

(४) महाराष्ट्राचे मा. राज्यपाल, यांचे निदेशानुसार सन २०११-१२ च्या वार्षिक योजनेमध्ये सिंचन क्षेत्राकरीता नियत व्ययाचे वाटप खालिल प्रमाणे असेल -

अ) सिंचन क्षेत्राकरीता एकूण नियत वाटपाच्या विभाज्य खर्चामधून अंतरीम उपाय योजना म्हणून अनुशेष असलेल्या जिल्ह्यासाठी पुरेसा निधी राखून ठेवण्यात येईल. या साठी आवश्यक असलेल्या निधीत परिगणना करतेवेळी, जलसंपदा विभागाने अनुशेष दूर करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम तयार केला आहे त्यानुसार कामाची प्रगती व निधीची आवश्यकता विचारात घेणे आवश्यक आहे.

ब) जनजाती योजनेमध्ये आदिवासी लोकसंख्या व जनजाती उप योजनेखालील क्षेत्र ५० % विचारात घेवून जनजाती उप योजना निधीच्या नियतव्ययाचे वाटप करावे.

(५) सिंचन क्षेत्रासाठी असलेले नियतव्यय वाटप आणि अनुशेष असलेल्या इतर क्षेत्रामधील अनुशेष दूर करण्यासाठीचा निधी वजा केल्यानंतर, योजनांतर्गत उर्वरीत नियतव्ययाचा विभाज्य भाग, तीन प्रदेशामध्ये त्या त्या प्रदेशाच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात संवितरीत करण्यात यावा. तथापि योजनांतर्गत उर्वरीत नियतव्ययाच्या प्रदेश निहाय नियत वाटपात त्या क्षेत्रामधील त्या त्या प्रदेशाच्या गरजा व विकासाच्या संधी यावर अवलंबून राहून, त्या तीन प्रदेशामध्ये क्षेत्र निहाय वितरण होण्यासाठी लवचिकता असेल. याचा अर्थ असा कि, एखाद्या क्षेत्राचे आणि क्षेत्राखालील

योजना यासाठी प्रदेश निहाय नियत वाटप करण्यासाठी त्या त्या प्रदेशाच्या लोकसंख्येच्या प्रमाणाचा काटेकोरपणे आधार घेणे आवश्यक नाही. आणि प्रदेशाच्या विशेष गरजा व विविध क्षेत्रामधील प्रदेशाच्या विकासाच्या संधी लक्षात घेवून, तीन प्रदेशामध्ये व तीन प्रदेशामधील क्षेत्राखालील योजनामध्ये क्षेत्रिय नियतव्ययाच्या विवरणात लवचिकता असेल. तथापि, प्रदेशाची सर्व क्षेत्रिय नियतव्ययाची एकूण रक्कम हि, जो नियतव्यय त्या त्या प्रदेशाच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात वितरीत केला आहे. अशा योजनांतर्गत उर्वरीत नियतव्ययातील त्या त्या प्रदेशाच्या हिस्याच्या एकूण कमाल मर्यादेच्या आत असेल.

( ६) मा. राज्यपाल महोदयांच्या पुर्व मान्यतेशिवाय कोणताही निधी अनुशेष असलेल्या जिल्ह्याकडून अनुशेष नसलेल्या जिल्ह्याकडे आणि एका विकास मंडळाच्या कार्यक्षेत्राकडून दूसऱ्या विकास मंडळाच्या कार्यक्षेत्राकडे वळविता येणार नाही.

## १.९ शिक्षण, प्रशिक्षण आणि सेवायोजन यासाठी सुयोग्य व्यवस्था :

संपूर्ण राज्याच्या गरजा साकल्याने लक्षात घेऊन, प्रत्येक विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रासाठी तंत्रशिक्षण व व्यवसायीक प्रशिक्षण यासाठी पर्याप्त सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी आणि राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवामध्ये नोकरीच्या पर्याप्त संधी उपलब्ध करुन देण्यासाठी समन्यायी व्यवस्था करण्याची राज्यपाल खातरमजा करतील आणि त्या प्रयोजनासाठी राज्यपाल, वेळोवेळी, राज्य शासनास योग्य ते निर्देश देतील, आणि असे करीत असतांना, आवश्यक आणि योग्य वाटल्यास, राज्यपाल, कोणत्याही एका व्यक्तीचा किंवा व्यक्ती संघाचा याबाबतीत सल्ला घेऊ शकतील.

# प्रकरण – दोन

## मंडळाच्या सदस्य सचिवांचा अहवाल

### २.१ मंडळाचे कार्यक्षेत्र व मुख्यालय :

मंडळाचे कार्यक्षेत्र संपूर्ण मराठवाडा विभागासाठी असून, त्यात औरंगाबाद महसूल विभागातील औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, बीड व उस्मानाबाद जिल्ह्यांचा समावेश आहे. मंडळाचे मुख्यालय औरंगाबाद येथे आहे.

### २.२ कार्यालय आस्थापना :

मराठवाडा विकास मंडळाचे कार्यालयामध्ये मंडळाचे अध्यक्षांकरिता आणि मंडळाचे सदस्य सचिवांकरिता वेगवेगळ्या अशा स्वतंत्र आस्थापना आहेत. मंडळाचे अध्यक्ष व सदस्य-सचिव यांचे आस्थापनेकरिता स्वतंत्र पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. नियोजन विभागाने मंडळाचे आस्थापनेवरील विविध संवर्गातील एकूण २३ पदे मंजूर केली आहेत.

अहवाल वर्ष २०११-१२ मध्ये मंडळातील मा. अध्यक्षांचे आस्थापनेवरील मंजूर व भरलेल्या पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

(अ) **मा.अध्यक्षांचे कार्यालयाकरिता कर्मचारी वर्ग** :

| अ क्र | पदांचे नांव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | खाजगी सचिव | १ | ० | १ |
| २ | स्वीय सहाय्यक | २ | १ | १ |
| ३ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | १ | १ | -- |
| ४ | लिपीक/टंकलेखक | १ | १ | -- |
| ५ | वाहन चालक | १ | १ | ० |
| ६ | चोपदार | १ | ० | १ |
| ७ | शिपाई / संदेश वाहक | ३ | २ | १ |
| **एकूण** | | **१०** | **६** | **४** |

**ब) <u>अपर आयुक्त व सदस्य सचिवांचे कार्यलयामधील कर्मचारी वर्ग</u> :**

| अ क्र | पदाचे नांव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | अपर आयुक्त व सदस्य सचिव | १ | १ | - |
| २ | सहसंचालक | १ | १ | - |
| ३ | प्रशासकीय अधिकारी-नि-संशोधन अधिकारी | १ | १ | - |
| ४ | संशोधन सहायक | २ | २ | - |
| ५ | सहाय्यक लेखाधिकारी | १ | १ | ० |
| ६ | लघुलेखक (उच्चश्रेणी) | १ | ० | १ |
| ७ | अव्वल कारकुन | १ | १ | - |
| ८ | लिपीक/टंकलेखक | १ | १ | - |
| ९ | वाहन चालक | २ | १ | १ |
| १० | शिपाई | २ | २ | - |
| | **एकूण** | **१३** | **११** | **२** |

मा. अध्यक्षांचे कार्यालयाकरिता स्विय सहाय्यक, लघुलेखक उच्चश्रेणी व लिपीक / टंकलेखक, (वाहन चालक, व शिपाई दैनिक रोजंदारीवर) अशी पदे भरलेली आहेत.

सदस्य सचिवांचे पद भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांच्या संवर्गातील आहे. सहसंचालक, प्रशासकीय अधिकारी–नि-संशोधन अधिकारी, तसेच संशोधन सहाय्यकांची २ पदे अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे संवर्गातून भरण्यात आली आहेत. सहाय्यक लेखाधिकारी यांचे १ पद लेखा व कोषागारे संचालनालयाचे संवर्गामधील आहे. अव्वल कारकून १ पद, लिपीक / टंकलेखक १ पद व शिपायांची तीन पदे पाटबंधारे विभागातील संवर्गातून प्रतिनियुक्तीने भरण्यात आली असून दुसरे १ पद विभागीय आयुक्त (अतिरिक्त सेल) औरंगाबाद यांचे आदेशानुसार मत्स्य व्यवसाय कार्यालयातून भरण्यात आलेले आहे. तसेच वाहन चालकाचे १ पद विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद येथून भरण्यात आलेले-आहे.

## २.३ मंडळाच्या सर्वसाधारण बैठका :

मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रातील विविध विकासात्मक कामाच्या संबंधात सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा करण्यात आली. सिंचन, रस्ते विकास, सामान्य आरोग्य, शिक्षण, तांत्रिक शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, कृषि, फलोद्यान, सामाजिक सेवा-क्षेत्रे अशा विविध क्षेत्रातील विकासात्मक कामासंबंधी तसेच विविध विकास क्षेत्रातील मराठवाडयाचा अनुशेष याबाबत सभेमध्ये चर्चा करण्यात आली.

२०११-१२ या अहवाल वर्ष काळात मंडळाने खाली नमूद केलेल्या दिनांकाचे दिवशी सर्वसाधारण सभा आयोजित केल्या :

| अ.क्र | सन २०११-१२ मध्ये मंडळाच्या सर्वसाधारण सभा आयोजित केलेल्या तारखा |
|---|---|
| १ | १८.६.२०११ |

## २.४ विषय समित्याच्या बैठका:

राज्यपालांचे दिनांक ५ ऑगस्ट, १९९४ चे आदेशातील परिच्छेद ४ (३) अन्वये, वैधानिक विकास मंडळाला त्यांच्या क्षेत्रातील विकास कामांचे संदर्भात तज्ञांचे मार्गदर्शन व सल्ला घेण्यासाठी विषय समित्या स्थापन करण्याची तरतूद आहे. त्या अनुषंगाने मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने खालील विषय समित्या स्थापन केलेल्या आहेत.

| अ.क्र. | विषय समित्यांच्या बैठका | बैठकीचा दिनांक |
|---|---|---|
| १ | कृषि, पिक-संवर्धन, फलोद्यान | २२.०८.२०११ |
| २ | सहकार, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, कृषि-पणन, कृषि पत पुरवठा | २२.०८.२०११ |
| ३ | पाटबंधारे व कडा | २३.०८.२०११ |
| ४ | उद्योग व उर्जा | २३.०८.२०११ |
| ५ | ग्रामीण विकास | २४.०८.२०११ |
| ६ | समाज कल्याण, मागासवर्गीय कल्याण, महिला व बालविकास | २४.०८.२०११ |
| ७ | माहिती तंत्रज्ञान आणि विज्ञान व तंत्रज्ञान | २५.०८.२०११ |
| ८ | सामान्य शिक्षण व तांत्रिक शिक्षण | २५.०८.२०११ |
| ९ | आरोग्य सेवा, पाणी पुरवठा, नागरी विकास | २६.०८.२०११ |
| १० | वाहतुक, दळणवळण व गृहनिर्माण | २६.०८.२०११ |

## २.५ इतर बैठका :

मंडळाने स्थापन केलेल्या निरनिराळया विषय समित्यांच्या बैठका खालील दिनांकाचे दिवशी आयोजित करण्यात आल्या.

| अ. क्र. | विषय | बैठकीचा दिनांक |
|---|---|---|
| १ | आदिवासी विभागातील आदीवासी भागाचा पाहणी अभ्यास | १८.०६.२०११ |
| २ | मराठवाडा विकास कामाच्या मागण्या संदर्भात आढावा बैठक | १३.९.२०११ |
| ३ | उच्च स्तरीय केळकर समिती - समतोल प्रादेशिक विकासाच्या समस्यांचा आढावा - पुर्व तयारी बैठक | १७.१०.२०११<br>२१.१०.२०११<br>३१.१०.२०११ |
| ४ | उच्च स्तरीय केळकर समिती ची बैठक | १०.११.२०११ |

## २.६ नियोजन मंडळाच्या बैठकीमध्ये वैधानिक विकास मंडळाचा सहभाग :

नियोजन प्रक्रियेमध्ये वैधानिक विकास मंडळाचा सक्रीय सहभाग असण्यावर राज्यपाल महोदयांनी निर्देश दिले होते. त्यानुसार राज्यस्तरावर तसेच जिल्हा स्तरावरील नियोजन प्रक्रियेमध्ये मंडळाने सक्रीय सहभाग घेतलेला आहे.

राज्य नियोजन मंडळावर वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्षांना पदसिध्द सदस्य म्हणून नेमण्यात आलेले आहे. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्षांनी राज्य नियोजन मंडळाने वेळोवेळी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय बैठकीस उपस्थित राहून नियोजन विषयक चर्चेत भाग घेतला. तसेच जिल्हा नियोजन मंडळावर मंडळाचे सदस्यांना पदसिध्द सदस्य म्हणून सहभागी करुन घेण्यात आले आहे. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे सदस्यांनी त्यांना नेमून दिलेल्या जिल्हयातील जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस वेळोवेळी उपस्थित राहून चर्चेत भाग घेतलेला आहे. तसेच जिल्हा नियोजन समितीमधील **"कोअर ग्रुप"** मध्ये सहभागी होऊन जिल्हा योजना तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये सदस्यांनी सहकार्य केले.

## २.७ विविध कार्यशाळेस मंडळाचे तज्ञ सदस्यांचा सहभाग :

मंडळाचे तज्ञ सदस्य डॉ. आर. पी. कुरुलकर (प्रभारी अध्यक्ष) यांनी सन २०११-१२ मध्ये विविध चर्चा सत्रामध्ये शोध निबंध सादर केले ते खालील प्रमाणे आहे.

१. सिंचनाचा अनुशेष या विषयीच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद मधील अर्थशास्त्र विभागातील सेमीनार मध्ये सहभाग (ऑक्टोबर २०११)

२. मानव विकास निर्देशांक विषयी संकल्पनेवर वार्षिक मराठी अर्थशास्त्र परिषद, नांदेड येथे व्याख्यान दिले. (नोव्हेंबर २०११)

३. जानेवारी २०१२ मध्ये जनता विकास परिषद, औरंगाबाद येथे मराठवाडयाचा सामाजीक व आर्थिक विकास यावर महत्वाचे टिपण सादर केले.

४. केळकर समितीने डॉ. आर. पी. कुरुलकर यांना मराठवाडा विभागीय अभ्यास २०११ बाबत प्रकल्प मंजूर केला आहे.

# प्रकरण – तीन

## कामकाजासंबधी अनुषंगीक बाबीवर मंडळाच्या शिफारशी

### ३.१ मराठवाडा विभागातील आदिवासी भागाचा पाहणी अभ्यासः

मराठवाडा विभागातील आदिवासी भागांचा पाहणी अभ्यास करण्यासाठी मा.राज्यपाल महोदय यांचे कार्यालयांचे निर्देशानुसार प्राप्त झालेल्या १० विषयापैकी खालील विषयाची निवड पाहणी अभ्यास करण्यासाठी करण्यात आली.

१. आदिवासी मुलांच्या प्राथमिक शिक्षणाची स्थितीः शैक्षणीक दर्जा. शिक्षणाच्या सोयी सुविधा, आणि आदिवासी मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे.

२. आदिवासी मुलांमधील कुपोषणाच्या समस्या

३. आदिवासींच्या जमिन हक्क कायद्याची अमलबजावणी, कृषी व कृषि सलग्न सेवातील योजनांची अमलबजावणीची सद्यस्थिती.

उपरोक्त विषयाची पाहणी करण्यासाठी मंडळ स्तरावर मा. डॉ. आर पी कुरुलकर, प्रभारी अध्यक्ष, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती स्थापना करुन त्यामध्ये संबधित विषयाच्या तज्ञांचा समावेश करण्यात आला. सदर समितीच्या बैठकांमध्ये पाहणीची रुपरेषा ठरविण्यात आली.

त्यानुसार विभागातील प्रत्येक जिल्हयातील तालुकानिहाय गावांची निवड करण्यासाठी १. सन २००१ च्या जनगणनेचा आधार घेण्यात आला. २. प्रत्येक गावातील एकुण लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी काढुन ती उतरत्या क्रमाने घेवून ५०% च्या वरील आदिवासी लोकसंख्या असलेल्या गावामधुन १०% गावांची निवड १,११,२१.....याप्रमाणे करण्यात आली. नांदेड जिल्हयात १२३ गांवापैकी १२ गांवे, हिंगोली जिल्हयात ६१ गांवापैकी ६ गांवे, परभणी जिल्हयात १३ गांवापैकी १ गांव, औरंगाबाद जिल्हयात २७ गांवापैकी ३ गांवे, तसेच बीड, जालना, उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यातुन प्रत्येक एक गांव असे मराठवाडयातील ८ जिल्ह्यातुन एकुण २६ गावांची निवड सर्वेक्षणासाठी करण्यात आली.

तसेच वरील निवडलेल्या विषयाशी संबधित १. गांव पत्रक २. प्राथमिक शिक्षणाचे पत्रक ३. कुपोषणाचे पत्रक व ४. कुटुंब पत्रक इ. विषयनिहाय प्रश्नावली तयार करण्यात आल्या.

त्याप्रमाणे नांदेड, हिंगोली, परभणी, उस्मानाबाद व लातुर या जिल्हयासाठी स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ व औरंगाबाद, जालना व बीड या जिल्हयासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठातील विद्यार्थी व शिक्षक यांची नेमणुक प्रगणक व पर्यवेक्षक म्हणुन करण्यात आली. त्यांचेशी समन्वय साधण्यासाठी समन्वय अधिकारी म्हणुन शासकीय अधिका-यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

वरीलप्रमाणे निवडण्यात आलेल्या गांवातील आदिवासी कुटुंबाची यादी मुख्य कार्यकारी अधिका-यांचे मार्फत संबधित बालविकास प्रकल्प अधिकारी यांचेकडुन घेवुन त्यामधुन कुटुबांची निवड करण्यात आली व प्रगणक, पर्यवेक्षक व समन्वय अधिकारी यांना प्रशिक्षण देवुन निवडलेल्या कुटुंबाची यादी व वरीलप्रमाणे ४ प्रकारचे पत्रके पाहणीसाठी त्यांचेकडे सुपुर्द करण्यात आली. त्यानुसार प्रगणक व पर्यक्षकांनी निवडलेल्या गावातील निवडलेल्या आदिवासी कुटुंबाची प्रत्यक्ष पाहणी करुन १.गांव पत्रक २. प्राथमिक शिक्षणाचे पत्रक ३. कुपोषणाचे पत्रक व ४. कुटुंब पत्रकामध्ये माहिती भरुन या कार्यालयास सादर करण्यात आले. प्रगणक / पर्यवेक्षकांनी भरलेले सर्व पत्रके कार्यालयात संकलीत केल्यानंतर तज्ञ सदस्यांना सांख्यिकी माहिती अहवालाचे लिखाण करणेस्तव पुरविण्यात आली.

मराठवाडा विभागातील आदिवासी भागाचा पाहणी अभ्यासाचा निष्कर्ष अहवाल दिनांक १८ ऑक्टोबर २०११ रोजी मा. राज्यपाल महोदयांना सादर करण्यात आला.

## ३.२ आंतर विभागीय विकासाचे महत्वाचे निर्देशांक

**संपूर्ण राज्याच्या विकासाच्या पातळयांच्या तुलनेत योग्य निर्देशांकाच्या आधारे मंडळाच्या क्षेत्रातील विविध विकास क्षेत्रासाठी सापेक्ष पातळी निश्चित करणे. या संदर्भात या अहवालात आम्ही कांही प्रमुख क्षेत्र / निर्देशांकांचा तुलनात्मक अभ्यास देत आहोत.**

### (अ)- <u>विभागीय दरडोई विकास दर तुलना</u> :-

**महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेल्या आर्थिक पाहणी अहवाल २०११-१२ नुसार सन २००९-१० २०१०-११ या दोन वर्षाच्या जिल्हास्तरीय दरडोई उत्पन्नाची चालू किंमतीनुसार विभाग निहाय आंकडेवारी खालील प्रमाणे आहे.**

**विभाग निहाय जिल्हा दरडोई उत्पन्नातील वृध्दी दर (चालू किंमतीनुसार) (दरडोई उत्पन्न रुपये)**

| अ क्र | विभाग | २००९-१० | २०१०-११ | वृध्दीदर % |
|---|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | ७१५४८ | ८४२९५ | १७.८२ |
| २ | जालना | ४२६९८ | ५०२६२ | १७.७२ |
| ३ | परभणी | ४२३८५ | ५०७१६ | १९.६६ |
| ४ | हिंगोली | ३४३४० | ४९४७० | ४४.०६ |
| ५ | बीड | ३९४१५ | ५२१७७ | ३२.३८ |
| ६ | नांदेड | ३६५८१ | ४४९७८ | २२.९५ |
| ७ | उस्मानाबाद | ३७८९० | ४८८८७ | २९.०२ |
| ८ | लातूर | ४२७९७ | ८१५५७ | ९०.५६ |
|  | **मराठवाडा** | **४५५७५** | **६००१३** | **३१.६८** |
| १ | कोकण विभाग | १०५३७९ | १२५२७ | १९.१२ |
| २ | नाशीक विभाग | ५५९१४ | ७२२०९ | २९.१४ |
| ३ | पुणे विभाग | ७७२२१ | ९३६२६ | २१.२४ |
|  | **उर्वरित महाराष्ट्र** | **८७१७६** | **१०५४८८** | **२१.००** |
| १ | अमरावती विभाग | ४३५२७ | ५७५०० | ३२.१० |
| २ | नागपूर विभाग | ६१६४० | ७३२३१ | १८.८० |
|  | **विदर्भ** | **५२७४७** | **६५५०२** | **२४.१८** |
|  | **महाराष्ट्र** | **७१३००** | **८७६८६** | **२२.९८** |

स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी -२०११-१२ पान क्रमांक ३१ व ३२

## (ब) तुलनात्मक औद्योगिक प्रगती:

दरडोई उत्पन्नात सातत्याने व चिरस्थयी वृध्दी करण्यासाठी आद्योगीक वाढ महत्वाची ठरते. शासनाने, शिथिलता (liberalization), खाजगीकरण (Privatization) व जागतिकीकरणाचे (Globalization) धोरण स्विकारुन ते अंमलात आणल्यामुळे, त्याचा परिणाम मागास मराठवाडा व विदर्भावर कसा झाला हे अभ्यासणे उपयुक्त ठरेल. स्थानिकीकरणाचे धोरण (Location policy) आता रद्द झाल्यामुळे आता उद्योजक भारतात कुठेही आपला उद्योग उभारु शकतो. पुढील तक्त्यात, सन २०११ पर्यंत महाराष्ट्रातील तीन विभागांची तुलनात्मक आद्योगिक प्रगती कशी झाली हे दाखविले आहे.

**महाराष्ट्रातील सुक्ष्म, लघु, मध्यम व मोठया उद्योगांची विभागवार प्रगती (२०११)**

| अ क्र | विभाग | सूक्ष्म, लघु, मध्यम, उद्योग (संख्या) | रोजगार.संख्या (लाखात) | मोठे उद्योग (संख्या) | रोजगार.संख्या (लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | उर्वरित महाराष्ट्र | १३०४०४ (८०.०३) | १०.९७ (७८.४०) | ३६८८ (७५.०३) | ८.५ (७५.५५) |
| २. | मराठवाडा | १२२७१ (७.५२) | १.१७ (८.४०) | ५३८ (११.००) | १.११ (९.९०) |
| ३. | विदर्भ | २०२९८ (१२.४५) | १.८५ (१३.२०) | ६८९ (१४.०२) | १.६४ (१४.५५) |
| | एकूण | १६२९७३ (१००.००) | १३.९९ (१००.००) | ४९१५ (१००.००) | ११.२५ (१००.००) |

**कंसातील आंकडे एकूणशी शेकडा प्रमाण आहेत.**
**स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी -२०११-१२**

वरील तक्त्यावरुन सुक्ष्म, लघु, मध्यम उद्योग औद्योगीक संस्थांपैकी केवळ ७.५२% उद्योग मराठवाडयात आहेत. तर मोठया उद्योगांचे प्रमाण ११ % आहे. याव्दारे निर्माण झालेल्या रोजगाराची टक्केवारी अनुक्रमे ८.४०% व ९.९०% आहे. औरंगाबाद वगळता, इतर जिल्हयात फारसे औद्योगिकीकरण मराठवाडयात झालेले दिसत नाही. याउलट, उर्वरित महाराष्ट्रात उद्योगांचे केंद्रीकरण झाल्याचे वरील तक्त्यावरुन स्पष्ट होते.

जोपर्यंत औद्योगिक असमतोल कमी होणार नाही तोपर्यंत प्रादेशिक असमतोल कमी होणे शक्य नाही असे मंडळास वाटते. त्यासाठी मागास भागात आर्थिक पायाभूत सुविधा (Economic Infrastructure) उदा. उत्तम रस्ते, रेल्वे, विमान सेवा, पाणी, वीज इ. व (Social Infrastructure) उदा. उत्तम शिक्षण संस्था, दवाखाने, कौशल्ययुक्त मनुष्यबळ, इत्यादी. प्रकारची सामाजीक पायाभूत सुविधा निर्माण करणे गरजेचे आहे तरच उद्योजक मागास भागात येतील.

## (क) विशेष आर्थिक क्षेत्र व मागास विभाग:-

पुढील तक्त्यात "महाराष्ट्रातील विशेष आर्थिक क्षेत्राची (Special Economic Zones) सन २०११ पर्यंतची विभागवार प्रगती दाखविली आहे. त्यांत एकूण ११६ आर्थिक क्षेत्रापैकी फक्त १० आर्थिक क्षेत्रे मराठवाडयात असून विदर्भातही केवळ १० आर्थिक क्षेत्रे आहेत, याउलट उर्वरित महाराष्ट्रात ९६ विशेष आर्थिक क्षेत्र आहे. सर्व विभागांच्या तुलनेत मराठवाडा विभागात सर्वात कमी गुंतवणूक झालेले असून ती एकूण गुंतवणुकीच्या प्रमाणात नगण्य स्वरुपाची आहे. ह्या आर्थिक क्षेत्रामुळे उर्वरित महाराष्ट्रात निर्माण होणारा अपेक्षित रोजगार एकूण रोजगाराच्या ८६.६५% आहे. याउलट, मराठवाडयात निर्माण होणारा रोजगार केवळ २.१९% व विदर्भात ११.१६% इतका आहे.

महाराष्ट्रातील विशेष आर्थिक क्षेत्रांची प्रगती (२०११ पर्यंत)

| अ क्र | विभाग | विशेष आर्थिक क्षेत्रांची संख्या | टक्केवारी | अपेक्षित गुंतवणूक कोटी रुपये | टक्केवारी | अपेक्षितरोजगार संख्या लाखात | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | उर्वरित महाराष्ट्र | ९६ | ८२.७५ | १२१५८८ | ८९.३८ | ४५.३४ | ८६.६५ |
| २ | मराठवाडा | १० | ८.६२ | २८४५ | २.०१ | १.१५ | २.१९ |
| ३ | विदर्भ | १० | ८.६२ | ११५९५ | ८.५३ | ५.८५ | ११.१६ |
| ४ | एकूण | ११६ | १००.०० | १३६०२८ | १००.०० | ५२.३४ | १००.०० |

स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी -२०११-१२

वरील दोन तक्त्यावरुन महाराष्ट्रातील औद्योगिक प्रगतीचा क्षेत्रीय असंतुलन कमी करण्यासाठी नवीन उपाय योजना करणे गरजेचे आहे.

# प्रकरण – चार

## समतोल प्रादेशिक विकासाच्या समस्यांचा आढावा

### ४.१ समतोल प्रादेशिक विकासाच्या समस्यांचा आढावा घेण्यासाठी उच्चस्तरीय समितीची स्थापना

**महाराष्ट्र शासन नियोजन विभाग शासन निर्णय क्र: अनुशेष-२००९/प्रक्र.४०५/का-१४१६ दिनांक ३१ मे २०११**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी दिनांक २७.५.२००९ तसेच १९.३.२०१० च्या निदेशामध्ये अनुशेष आणि विकास खर्चाचे समान वितरणाच्या नव्या दृष्टीने विचार करुन साधन संपत्तीचे समन्यायतेने नियत वाटप होईल याची खात्री करुन देणारे पर्यायी मार्ग शोधणे अत्यावश्यक आहे. म्हणून तीनही प्रदेशातील विविध क्षेत्रातील विद्यमान स्थिती लक्षात घेऊन त्यांच्या विकासाच्या मुद्यावर लक्ष देण्यासाठी आणि खर्चाच्या समान न्याय वाटपासाठी समुचित नियत वाटपांची तत्वें सुचित करण्यासाठी तज्ञांची समिती गठीत करण्याचे निदेश दिले आहेत. त्यानुसार राज्य मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार उच्चस्तर समिती स्थापन करण्यात आली आहे.

**श्री विजय केळकर, तेराव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली समितीची रचना**

| अ क्र | नांव, पदनाम व पत्ता | कार्यक्षेत्र | पद |
|---|---|---|---|
| १ | श्री विजय केळकर, १३ व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष | अर्थ शास्त्रज्ञ | अध्यक्ष |
| २ | डॉ अभय पेठे, विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई | अर्थ शास्त्रज्ञ | सदस्य |
| ३ | डॉ मुकुंद घारे, पुणे. | जलसंधारण | सदस्य |
| ४ | श्री विजय अण्णा बोराडे, अध्यक्ष महाराष्ट्र जलसंधारण सल्लागार परिषद, औरंगाबाद | जलसंधारण | सदस्य |
| ५ | डॉ अभय बंग, गडचिरोली | वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते | सदस्य |
| ६ | श्रीमती कुमुद बन्सल, माजी भारतीय प्रशासनिक/ सेवा अधिकारी, मुंबई | शिक्षण | सदस्य |
| ७ | डॉ माधव चितळे, माजी केंद्रीय जलसंपदा सचिव,औरंगाबाद | जलसंपदा | सदस्य |
| ८ | डॉ.विनायक देशपांडे,विभाग प्रमुख (अर्थशास्त्र) नागपूर विद्यापीठ, नागपूर (माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद) | अर्थ शास्त्रज्ञ | सदस्य |
| ९ | डॉ.(श्रीमती) संगीता कामदार, एन. एम. आय. एम. एस. विद्यापीठ, विलेपार्ले, मुंबई | व्यवस्थापन | सदस्या |
| १० | डॉ.दिलीप नाचणे,इंदिरा गांधी संशोधन संस्था,गोरेगांव,मुंबई | अर्थशास्त्रज्ञ | सदस्य |

| अ क्र | नांव, पदनाम व पत्ता | कार्यक्षेत्र | पद |
|---|---|---|---|
| ११ | डॉ.आर पी कुरुलकर, सदस्य, मराठवाडा विकास मंडळ, औरंगाबाद | शैक्षणिक | सदस्य |
| १२ | डॉ. व्ही. एम. मायंदे, कुलगुरु डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला | कृषी | सदस्य |
| १३ | महासंचालक, यशदा पुणे | | सदस्य |
| १४ | प्रधान सचिव, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन | नियोजन | सदस्य सचिव |

## ४.२ उच्चस्तरीय समितीची कार्यकक्षा

उच्च स्तरीय समितीची कार्यकक्षा खालील प्रमाणे असेल.

१) विकासातील क्षेत्रीय असमतोलाचा अंदाज घेण्यासाठी निर्देशांक ठरविणे

२) वरील १ बाबत सन २०१० अखेर अगदी अलिकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे महाराष्ट्राच्या सरासरी विकासाच्या संदर्भात असमतोल निश्चित करणे. हे करित असतांना राज्य शासनाची थेट गुंतवणूक/ खर्च आणि राज्य व केंद्र शासनाच्या मदतीने खाजगी औद्योगिक क्षेत्रात झालेली गुंतवणूक याचा विचार करणे

३) निश्चित केलेल्या निर्देशांकापैकी प्राधान्याने कोणत्या निर्देशांकावर कार्यवाही होऊ शकेल याची मर्यादा ठरविणे.

४) निश्चिंत होणारा असमतोल दूर करण्यासाठी उपाय योजना सुचविणे व त्या अनुषंगाने विकासात्मक निधीच्या अवंटनाचे सूत्र ठरविणे तसेच भविष्यात पुन्हा असमतोल निर्माण होऊ नये म्हणून उपाय सुचविणे. त्या अनुषंगाने वैधानिक विकास मंडळाच्या भुमिकेबाबत सूचना करणे.

५) समिती आपली कार्यपध्दती स्वत: ठरवेल.

## ४.३ समतोल प्रादेशिक विकास समितीचा औरंगाबाद विभागाचा दौरा

मराठवाडा विभागातील समतोल प्रादेशिक विकासाबाबत उच्चस्तरीय समितीने औरंगाबाद विभागात दिनांक ९ व १० नोव्हेंबर २०११ रोजी भेट दिली. दिनांक ९ नोव्हेंबर २०११ रोजी जालना जिल्ह्यास भेट देऊन जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळच्या सत्रात जालना जिल्हयातील संसद सदस्य व विधान मंडळ सदस्य, जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष यांचेशी चर्चा केली.

सदरील चर्चेत जालना जिल्ह्याचे पालक मंत्री व पदाधिकारी यांनी समितीसमोर जिल्हयाच्या समस्यांबाबत निवेदन मांडले.

दुपारच्या सत्रात जालना जिल्हयातील नगर परिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, पंचायत समितीचे सभापती, उपसभापती तसेच जिल्ह्यातील सार्वजनीक संस्था, स्वयंसेवी संघटना व जनतेचे विचार समितीने जाणून घेतले.

दिनांक १० नोव्हेंबर २०११ रोजी विभामीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद येथे सकाळच्या सत्रतील पूर्वार्धात मराठवाडा विकास मंडळाचे सदस्य, मानव विकास आयुक्त श्री कृष्णा भोगे यांचेशी तसेच औरंगाबाद विभागातील प्रादेशिक अधिकारी यांची मते उच्चस्तरीय समितीने जाणून घेतली. याच सत्रातील उत्तरार्धात विभागातील संसद सदस्य व विभागातील विधान मंडळ सदस्य विभागातील जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष, विभागातील महानगरपालिकाचे महापौर व उपमहापौर यांचेही विचार जाणून घेतले.

दिनांक १० नोव्हेंबर २०११ रोजीच्या दुपारच्या सत्रात सदरील उच्चस्तरीय समितीने सिडको औरंगाबाद येथील नाट्यगृहात विभागातील नगरपरिषद अध्यक्ष - उपाध्यक्ष, पंचायत समितीचे सभापती- उपसभापती, तसेच विभागातील सार्वजनीक संस्था, स्वयंसेवी संघटना व जनतेचे विचार जाणून घेतले. या शिवाय विविध कार्यालयातील लोक प्रतिनिधी संघटना व जनतेने प्रस्तावित केलेले प्रस्ताव, उच्चस्तरीय समितीने स्विकारले.

### ४.४ उच्च स्तरीय समितीसमोर मराठवाडा विकास मंडळाचे सादरीकरण

दिनांक १० नोव्हेंबर २०११ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद येथे प्रथम सत्रातील पूर्वार्धात मराठवाडा विकास मंडळाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त औरंगाबाद व मराठवाडा विकास मंडळाचे सदस्य सचिव श्री पंकज कुमार, भा.प्र.से. यांनी समितीसमोर विभागातील सविस्तर माहितीचे सादरीकरण केले. मराठवाडा विकास मंडळाची स्थापना, विभागाची रचना, विभागाचे कार्य तसेच विकास मंडळाची प्रास्ताविक भूमिका, आतापर्यंतच्या खर्चाचा संक्षीप्त ताळमेळ, अनुशेष भरुन काढण्यासाठी उपलब्ध झालेला निधी, त्याचा खर्च, विद्यमान स्थितीतील अनुशेष, विशेष निधी अंतर्गत घेण्यात आलेली कामे, मराठवाडा विभाग, विदर्भ विभाग व उर्वरित महाराष्ट्र यांचेशी तुलना करुन विभागातील लोकसंख्या, साक्षरतेचे प्रमाण, स्त्री - पुरुष प्रमाण, सन २००२ चा मानव विकास निर्देशांक, दरडोई जिल्हा उत्पन्न व राज्य उत्पन्नात अधिक विभागाचा वाटा, विशेष आर्थिक क्षेत्रांची प्रस्तावीत गुंतवणूक व निर्माण होणारे रोजगार, उद्योग क्षेत्रातील या तीन विभागाची तुलनात्मक आंकडेवारी, म्हाडा अंतर्गत बांधण्यात आलेली घरे, राजीव गांधी ग्रामीण निवारा या योजनेंतर्गत बांधण्यात आलेली घरे, १० हेक्टर पेक्षा अधिक शेती धारण करणा-या शेतक-याची संख्या,

**लोहमार्गाची लांबी,** रस्त्याची लांबी, १.०० लक्ष लोकसंख्येमागे असलेल्या रुग्णालयाची संख्या **विद्यार्थी - शिक्षक** प्रमाण, तंत्र शिक्षण संस्था, बँकाच्या शाखा, शासकीय गोदामे, स्वस्त धान्ये **दुकाने,** पशुधनासाठी सुविधा याची तुलनात्मक माहिती सादर करुन मराठवाडा विभागात घ्यावयाची **आवश्यक** असलेली योजना कार्यक्रम यासाठी अंदाजीत लागणारा निधी यांची सविस्तर माहिती सादर करण्यात आली.

## ४.५ <u>राज्य शासनाची थेट गुंतवणूक / खर्च आणि राज्य व केंद्र शासनाच्या मदतीने खाजगी औद्योगीक क्षेत्रात झालेली गुंतवणूक यांचा विचार</u>

मराठवाडयाची आर्थिक विषमता, शेतीपासुन हमी उत्पादनाचा अभाव, शेतीमालाला अपेक्षीत बाजारपेठ उपलब्ध नसणे, कच्चा माल साठवून ठेवण्याची शेतक-याची क्षमता नसणे, प्रक्रिया उद्योग सहकारी तत्वावर चालविण्यासाठी मार्गदर्शन नसणे, आधुनिक साधने / तंत्रज्ञानाचा वापर करुन शेती करण्यासाठी बँकांचे पुरेसे अर्थ सहाय्य, ही प्रमुख कारणे ग्रामीण अर्थ व्यवस्थेशी निगडीत आहेत.

मराठवाडयाचा विकास घडविण्यासाठी उद्योग हा एक महत्वाचा घटक आहे. सध्या मराठवाडयात एम. आय. डी. सी. /लघु सहकारी औद्योगीक वसाहती यांच्या क्षेत्रावर उद्योग धंदे चालू असून यातील बहुतांशी उद्योग धंदे बंद होण्याच्या स्थितीत आहेत. कृषि प्रक्रिया उद्योग कांही प्रमाणात बंद आहेत, मोठया उद्योगामध्ये लागणारे साहित्य इतर छोटया उद्योगामार्फत पुरविले जातात त्यामुळे अल्प प्रमाणात कामगारांना स्थायी स्वरुपात रोजगार मिळतो. मराठवाडयात भौतिक सुविधे अभावी मोठे उद्योजक आकर्षित होत नाहीत. उच्च दर्जाचे रस्ते, योग्य दाबाने वीज पुरवठा, पाणी पुरवठा, रेल्वे, हवाई वाहतुक सुविधां, इत्यादी बाबीकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.

## ४.६ निश्चित होणारा असमतोल दूर करण्यासाठी उपाय योजना

<u>भविष्यात पुन्हा असमतोल निर्माण होऊ नये म्हणून खालील उपाय योजना करणे गरजेचे आहे.</u>

१. समितीने निश्चित केलेला अनुशेष पूर्ण करण्यासाठी कालावधी ठरवुन देणे गरजेचे आहे.

२. जिल्हास्तरावर चालू असलेली अपूर्ण कामे/ प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखणे त्यासाठी पुरेशी तरतूद करणे.

३. Swot Anyalysis चा वापर करुन प्रत्येक विभागाने जिल्हा निहाय आराखडा तयार करणे आवश्यक आहे. सदर जिल्हा निहाय आराखडा संबंधीत जिल्हयाच्या जिल्हा नियोजन समिती समोर मांडून त्यास मान्यता देणे आणि त्याची भौतिक प्रगती सर्व सामान्य जनतेला पाहणीसाठी

विभागाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणे. जनता / सेवाभावी संस्था / तज्ञ व्यक्ती यांनी कार्यक्रम अंमलबजावणीबाबत उपस्थित केलेल्या मुद्यांचे निरसनकरणे व काळानुरुप आराखडयात आवश्यक ते बदल करणे.

४. अनुशेष निर्मुलनासाठी उपलब्ध झालेला निधी आर्थिक वर्षात निर्धारित कामावर खर्च न झाल्यास पुढील वर्षी तेवढा अतिरिक्त नियत व्यय अनुशेषातील कामाकरिता पुरवणी मागणीव्दारे उपलब्ध करुन द्यावा.

५. मराठवाडयात काम करणारे ठेकेदार आर्थिक दृष्टया सक्षम नसल्याने कामासाठी निधी उपलब्ध असल्याशिवाय काम अपेक्षित गतीने करीत नाहीत. या करिता वर्षाच्या सुरुवातीस निधी उपलब्ध करुन दिला जाईल असे पहावे.

६. योजनांची फारशी माहिती नसल्याने केंद्र पुरस्कृत / राज्य स्तरीय योजना / सहकार क्षेत्रातील योजनांचा लाभ मराठवाडयातील लोकांना अपेक्षित प्रमाणे मिळत नाही. या करिता स्वतंत्र यंत्रणा उभारावी.

७. मोठया उद्योजकांना आकर्षित करण्यासाठी भौतिक सुविधांबरोबरच अविकसीत औद्योगीक क्षेत्रातील उद्योजकांना अप्रत्यक्षरित्या करात सुट देण्यात यावी.

८. उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न झाले पाहिजेत.

### ४.७ मराठवाडा विकास मंडळाच्या प्रस्तावित कार्यकक्षा

१. विभागाचा विकास आराखडा तयार करणे

२. केंद्र पुरस्कृत / राज्य स्तरीय योजनांसाठी नियोजन विभागातून निधी उपलब्ध करुन देणे

३. कार्यान्वित योजनांचे पर्यवेक्षण, संनियंत्रण व मुल्यमापन करणे

४. मंडळ कार्यालयाचे बळकटीकरण करणे

५. महत्वाकांक्षी योजना राबविण्यासाठी जिल्हा व तालुक्यांची निवड करणे

६. विविध विषयावर चर्चासत्र, कार्यशाळा आयोजित करणे व शिफारशी करणे

७. क्षेत्रीय भेटी आयोजित करणे

८. प्रशिक्षीत मनुष्यबळ निर्माण करणे

# प्रकरण – पाच

## मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांनी सन २०१२-१३ च्या वार्षिक योजनेतुन सिंचन क्षेत्रासाठी प्रस्तावीत केलेले नियत व्यय

### ५.१ सिंचन क्षमतेत सुधारणा

निर्देशांक आणि अनुशेष समितीने निश्चित केलेला सिंचन क्षेत्रातील अनुशेष हा २०१०-११ पर्यंत पूर्णत: भरुन काढण्यात आला आहे. निर्देशांक अनुशेष समितीने काढलेला आर्थिक अनुशेष पूर्ण झालेला असला तरी सन १९९४ ते २०१० दरम्यान नव्याने अनुशेष निर्माण झालेला आहे. आता त्याचा विचार होणे गरजेचे आहे. उदाहरणादाखल सन १९९४ मध्ये निर्मित सिंचन क्षमतेची राज्य सरासरी ३५.११ % रब्बी समतुल्य (Rabi equivalent) होती. परंतू जुन २०१० मध्ये ही सरासरी ५८.०६% रब्बी समतुल्य (Rabi equivalent) वर पोचली. महाराष्ट्र राज्याच्या सिंचन विभागाने नव्याने दिनांक ३० जुन २०१० रोजी विभागवार अनुशेष काढला आहे. ही आंकडेवारी तक्त्यामध्ये दर्शविलेली असून विभागनिहाय अनुशेष खालील प्रमाणे दर्शविलेला आहे.

विभागनिहाय सिंचन अनुशेष, ३० जुन २०१० रब्बी समतुल्य (Rabi equivalent) आर्थिक किंमत रु ८०००० प्रति हेक्टर

| अ क्र | विभाग | अनुशेष जुन, २०१२ पर्यंत (हजार हे.) | एकूण अनुशेषाशी टक्केवारी | या अनुशेषा प्रमाणे भरुन निघणारी अंदाजित किंमत (कोटी रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | उर्वरित महाराष्ट्र | २१९.५४ | ११.५० | १७५६.३२ |
| २ | विदर्भ | ११५८.०१ | ६०.८० | ९२६४.०८ |
| ३ | मराठवाडा | ५२६.८९ | २७.७० | ४२१५.१२ |
| | **एकूण** | **१९०४.४४** | **१००.००** | **१५२३५.५२** |

(आधार: सिंचन विभाग, महाराष्ट्र शासन २०१० तक्ता क्रमांक ४)

### ५.२ सिंचन क्षेत्रासाठी निधी वाटपाचे सुधारीत सुत्र

सिंचन क्षेत्रातील अनुशेष व बिगर अनुशेष हे यासाठी पुर्वी खालील सूत्र विचारात घेतले जात असे.

i) ५०% भार हा सिंचन अनुशेष वर स्थित आहे.

ii) २५% भार हा मुंबई वगळता येत असलेली ग्रामीण भागातील लोकसंख्या

iii) २५% भार हा विभागाचे प्रत्यक्ष क्षेत्रफळ हे सूत्र सन २०१०-११ पर्यंत वापरण्यात आले.

आता अनुशेष व बिगर अनुशेष हि संकल्पना सिंचन क्षेत्रासाठी विचारात घेतली जात नाही. सिंचन क्षेत्रासाठी खालील सुधारित सूत्रानुसार नियतव्यय उपलब्ध करुन दिला जातो.

१. ५०% भार हा ग्रामीण भागातील लोकसंख्या (मुंबई वगळून)

२. ५०% भार हा प्रत्यक्ष दर्शविलेले विभागातील सिंचन क्षेत्र

सिंचन क्षेत्रातील नियत व्ययाचे वाटप सूत्रात नव्याने सुधारणा करणे आवश्यक आहे. कारण सन १९९४ ते २०११ या कालावधीत राज्य सरासरी विचारात घेता नव्याने अनुशेष निर्माण झाल्याचे दिसून येते. या करिता राज्य शासनाने विभागवार अनुशेष काढण्यासाठी डॉ. विजय केळकर निष्णात अर्थशास्त्रज्ञ यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीचे मे, २०१२ मध्ये गठीत केली आहे. सदर समितीचा अहवाल मार्च, २०१३ पर्यंत अपेक्षित आहे.

उच्चस्तरीय समितीच्या अहवाल येई पर्यंत प्रस्तावित नविन सुचनांनुसार निधी वाटप झाल्यास त्याचा फायदा मराठवाड्यासाठी होईल.

### ५.३ सिंचन क्षेत्रासाठी २०१२-१३ तील नियतव्ययाचे वाटप

**चालू सुत्रानुसार**

सिंचन क्षेत्रासाठी चालू वर्षी समजा रु. ५००० कोटी इतका निधी आरक्षित असेल तर तीन मंडळाच्या कार्यक्षेत्रात दोन भारांक विचारात घेता खालिल प्रमाणे निधी वाटप होईल.

**i)** ५०% निधी हा ग्रामीण लोकसंख्येच्या प्रमाणात (Rs. २५००) मुंबई वगळून
**ii)** ५०% निधी व प्रत्यक्ष क्षेत्रफळावर अवलंबून (Rs. २५००)

**चालू सुत्रानुसार - तक्ता क्रमांक -१**

| विभाग | ग्रामीण लोकसंख्येची टक्केवारी | नियतव्यय कोटी रु. | प्रत्यक्ष पेरणी क्षेत्र टक्केवारी | क्षेत्रफळाखालील नियत व्यय | एकूण निर्धारित नियत व्यय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| उर्वरित महाराष्ट्र | ५७.२९ | १४३२.२५ | ४५.४० | ११३५.०० | २५६७.२५ |
| विदर्भ | २४.३० | ६०७.५० | २८.२७ | ७०६.७५ | १३१४.२५ |
| मराठवाडा | १८.४१ | ४६०.२५ | २६.३३ | ६५८.२५ | १११८.५० |
| एकूण | १००.०० | २५००.०० | १००.०० | २५००.०० | ५०००.०० |

(टेबल -१ मध्ये चालू सूत्रानुसार निधीचे वितरण दर्शविले आहे, जे का सन २०१०-११ मध्ये वापरण्यात आले (असा दोन चलांक ( Variables ) धरुन) )

**सिंचन क्षेत्रासाठी २०१२-१३ तील नियतव्ययाचे वाटप**
**प्रस्तावित सुत्रानुसार**

सिंचन क्षेत्रासाठी चालू वर्षी समजा रु. ५००० कोटी इतका निधी आरक्षित असेल तर तीन मंडळाच्या कार्यक्षेत्रात तीन भारांक विचारात घेता खालिल प्रमाणे निधी वाटप होईल.

१) ५०% भार हा विभागवार अनुशेषावर (Rs. २५००कोटी)

२) २५% भार हा ग्रामीण लोकसंख्येवर (Rs. १२५० कोटी)

३) २५% भार हा प्रत्यक्ष पेरणी क्षेत्रावर (Rs. १२५० कोटी)

**प्रस्तावित सुत्रानुसार - तक्ता क्रमांक -२**

| विभाग | अनुशेषाची टक्केवारी | नियतव्यय रु.२५००.०० कोटी | ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण | नियतव्यय रु.कोटी | प्रत्यक्ष क्षेत्रफळ | नियत व्यय | एकूण रु.कोटी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| उर्वरित महाराष्ट्र | ११.५ | २८७.५० | ५७.२९ | ७१६.१२ | ४५.४० | ५६७.५० | १५७१.१२ |
| विदर्भ | ६०.८ | १५२०.०० | २४.३० | ३०३.७५ | २८.२७ | ३५३.३७ | २१७७.१२ |
| मराठवाडा | २७.७ | ६९२.५० | १८.४१ | २३०.१३ | २६.३३ | ३२९.१३ | १२५१.७६ |
| एकूण | १००.०० | २५००.०० | १००.०० | १२५०.०० | १००.०० | १२५०.०० | ५०००.०० |

यात प्रस्तावित सूत्रानुसार निधीचे वितरण दर्शविलेले आहे (जे की, अनुशेषासाठी निवडलेल्या तीन चलांक ( Variables ) वर आधारित आहे)

**चालु व प्रस्तावित सुत्रानुसार तफावत - तक्ता क्रमांक -३**

| विभाग | तक्ता क्रमांक २ प्रस्तावित सुत्रानुसार नियतव्यय रु.कोटी | तक्ता क्र.१ नुसार चालू सुत्रानुसार नियतव्यय रु.कोटी | नियतव्ययातील फरक रु.कोटी |
|---|---|---|---|
| १ | ३ | २ | ४ |
| उर्वरित महाराष्ट्र | १५७१.१२ | २५६७.२५ | - ९९६.१३ |
| विदर्भ | २१७७.१२ | १३१४.२५ | + ८६२.८७ |
| मराठवाडा | १२५१.७६ | ११९८.५० | + १३२.२६ |
| **एकूण** | **५०००.००** | **५०००.००** | -- |

चालू सूत्र आणि प्रस्तावित सूत्रानुसार तक्ता क्रमांक १ व २ मध्ये नियतव्यय उपलब्धतेमधील तपशीलाचे विवरण दर्शविण्यात आले आहे. तर दोन तक्त्यांमधील तफावत तक्ता क्रमांक ३ मध्ये दिसून येते. जर आपण प्रस्तावित सुत्र २०१२-१३ साठी स्विकारले तर उर्वरीत

महाराष्ट्राला रु. ९१३.९६ कोटी कमी मिळतील. तर विदर्भ व मराठवाड्यासारख्या मागास क्षेत्राला अनुक्रमे रु. ८८२.८७ कोटी आणि रु. १३२.२६ कोटीचा निधी अधिक मिळेल.

केळकर समितीचा अहवाल सादर करण्यास मुदतवाढ मिळालेली आहे. मा.राज्यपाल महोदयांनी महाराष्ट्र शासनाच्या सिंचन विभागाने दिनांक ३० जुन २०१० मध्ये नव्याने काढलेल्या अनुशेषांची आंकडेवारी विचारात घ्यांवे व राज्यातील या तीन विभागासाठीचे निधी वाटप हे प्रस्तावित सूत्रा आधारे करावे. हा दृष्टीकोन (approach) विदर्भ आणि मराठवाडयासारख्या मागासक्षेत्रास न्याय देणारा ठरेल. मराठवाडा विकास मंडळ औरंगाबादची मा.राज्यपाल महोदयांना अशी विनंती आहे की, आगामी अर्थसंकल्पात प्रस्तावित सुत्रानुसार तीन चलांक ( Variables ) विचारात घेवून सिंचन क्षेत्रातील निधीचे वितरण व्हावे जे मराठवाडा आणि विदर्भातील मागास भागासाठी उपयोगी ठरेल. जे राज्यासाठी समन्यायी (equitable) वाटप होईल.



शा.मु.औ.-(वाय) १२५-(१,००० पुस्तके)-११-२०१२.

# ENGLISH VERSION

# ANNUAL REPORT OF THE

# MARATHWADA DEVELOPMENT BOARD AURANGABAD

# FOR THE YEAR 2011-2012

**Submitted to the Hon'ble Governor of Maharashtra for placing before the Legislature under Article 371 (2) (a) of the Constitution of India and Clause 6 (d) of the Development Boards for Vidarbha, Marathwada and the Rest of Maharashtra Order, 1994.**

**Central Administrative Building, Ground Floor, West Wing, Aurangabad - 431 001.**

**Phone : 2335046 / 2339083** **Fax : 0240-2339083**

Email No. msdb.aurangabad@gmail.com



(Y) 125-6

# MARATHWADA STATUTORY DEVELOPMENT BOARD, AURANGABAD

No. MSDB/A.R.10-11/2011/
Central Administrative Building,
Ground Floor (W) Wing,
Collectorate Campus,
Aurangabad - 431 001
**Dated: / /2012.**

To,
H.E. The Governor of Maharashtra,
Raj Bhawan, Malabar Hill,
Mumbai – 400 035.

Subject: Submission of Annual Report of the Marathwada Development Board for the year 2011-2012.

Respected Sir,

It is an honour for me to submit the Annual Report of the Marathwada Development Board for the year 2011-2012.

For the holistic growth of Marathwada region, it is essential to increase investment in infrastructure for the growth of industries and social infrastructure, which will result in further increase in per capita income in the region. It is the need of the hour to enhance the allocation for micro irrigation apart from promoting other modern irrigation techniques. It is requested that the minor irrigation projects up to 600 he. may be allowed in the Marathwada region, wherever feasible.

In the field of education in all the districts of Marathwada region the percentage of literacy is less than the State average. There is need of special programme for reducing the mal nutrition level in tribal Block.

The Board has greatly benefited by the guidance it received from His Excellency the Hon'ble Governor of Maharashtra. The Board, therefore, expresses its deep sense of gratitude towards His Excellency and hopes that the valuable guidance would be available to the Board in future as well.

Yours sincerely,

17/10/12

**(Sanjeev Jaiswal)**
Acting Chairman & Divisional
Commissioner Aurangabad

# ACKNOWLEDGMENT

The Marathwada Development Board gratefully acknowledges the guidance it received from His Excellency, the Hon'ble Governor of Maharashtra.

The Hon'ble Governor took personal interest in the development of the region and had interaction with the Board on development issues on several occasions, which made it possible for the Board to discharge its functions effectively.

The Board is also grateful to the Hon'ble Chief Minister, Dy. Chief Minister and his cabinet colleagues for their co-operation in the development process of the region and implementation of the time-bound program for development of the region. The Board is also obliged to all the Hon'ble Ministers for their co-operation in sanctioning of the proposals of development works which the Board had recommended to the Government.

The Board acknowledges its gratitude towards all the Hon'ble Members of Parliament, Hon'ble Members of State Legislative Assembly and State Legislative Council, Presidents of Zilla Parishads, Presidents of Municipal Councils, Freedom Fighters, Social workers of the Marathwada region, for rendering co-operation to the Board.

The Board received valuable cooperation from experts from various fields of development. The Board is therefore thankful to them for the services rendered by them.

The Board is also grateful to the Chief Secretary, Govt. of Maharashtra, Additional Chief Secretaries, Principal Secretaries and Secretaries of various departments in Mantralaya, for rendering co-operation to the Board in implementing various development schemes.

The Board is also grateful to Principal Secretary Planning, Secretary to Hon. Governor, Joint Secretary (Development Boards), Dy. Secretary Planning, Under Secretary and their staff for their help and guidance provided to the Board. The Board is thankful to all those who have directly or indirectly associated themselves with the activities of the Board.

# Marathwada Development Board, Aurangabad
# Annual Report 2011-2012

| CONTENTS | | |
|---|---|---|
| **S. No.** | **Subject** | **Page No.** |
| **Chapter I** | **Establishment and Functions of Development Boards.** | 1 |
| 1.1 | The State of Maharashtra Order, 1994. | 1 |
| 1.2 | Establishment of Development Boards | 1 |
| 1.3 | Composition of the Development Boards | 1 |
| 1.4 | Duration of Board and Tenure of Board Members. | 2 |
| A) | Duration of Board | 2 |
| B) | Tenure of Board Members | 3 |
| 1.5 | Functions of the Board. | 3 |
| 1.6 | Allocation of funds for development expenditure | 4 |
| 1.7 | Allocation of funds to be reflected in annual financial statement | 4 |
| 1.8 | Directives by the Hon'ble Governor | 5 |
| 1.9 | Suitable arrangements for Education, Training & Employment. | 6 |
| **Chapter II** | **Report of the Member-Secretary** | 7 |
| 2.1 | Territorial jurisdiction and headquarters of the Board. | 7 |
| 2.2 | Office establishment. | 7 |
| 2.3 | General meetings of the Board. | 8 |
| 2.4 | Subject Committees Meeting | 8 |
| 2.5 | Other Meetings | 9 |